# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.08.2025** **वारःबुधवार**

1. 18व्या खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचं मुंबईत औपचारिक उद्घाटन; पंतप्रधानांकडून व्हिडीओ संदेशाद्वारे शुभेच्छा
2. देशात चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्प उभारण्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
3. राज्याच्या पोलीस दलात 15 हजार शिपाई भरती करण्याला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता आणि
4. नवी मुंबईत कॅपिटालँड डेटा सेंटरचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**<u>पंतप्रधान-ऑलिम्पियाड</u>**

युवा पिढीमध्ये विज्ञानाबद्दल औत्सुक्य वाढवण्यासाठी भारत कटिबद्ध असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारतात परंपरा आणि नवोन्मेष, आध्यात्मिकता आणि विज्ञान, औत्सुक्य आणि सर्जनशीलता हातात हात घालून चालतात, असं प्रतिपादन त्यांनी केलं. 18 व्या खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचं औपचारिक उद्घाटन काल मुंबईत झालं. या कार्यक्रमाला पंतप्रधानांनी व्हिडीओ संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या. जगभरातले तरुण, अभ्यास आणि संशोधनासाठी भारतात येतात, असं सांगून विज्ञान आणि अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताची प्रगती त्यांनी अधोरेखित केली. या ऑलिम्पियाड स्पर्धेत 64 देशांमधले 288 विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

**<u>संसद</u>**

नवीन प्राप्तीकर विधेयक, कर आकारणी विधेयक, राष्ट्रीय क्रीडा सुशासन विधेयक 2025 आणि राष्ट्रीय उत्तेजक पदार्थ विरोधी विधेयक 2025 या विधेयकांना काल संसदेची मंजुरी मिळाली. राज्यसभेत काल ही विधेयकं मंजूर करण्यात आली; त्याधीच ती लोकसभेत मंजूर झाली होती. लोकसभेत काल बंदरे विधेयक 2025 मंजूर झालं. बंदरांसंबंधित सर्व कायदे यात एकत्र करण्यात आले आहेत, देशातील बंदरांचा विकास, व्यवसायसुलभता आणि किनारपट्टीचा यथायोग्य वापर करण्याचा या विधेयकाचा उद्देश आहे. लोकसभेत काल खाण, खनिज विकास आणि नियमन विधेयकही मंजूर झालं.

दरम्यान वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना पदावरून हटवण्यासाठी महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव काल लोकसभेत सादर झाला. महाभियोग चालवण्यासाठीचे 146 सदस्यांचे प्रस्ताव सभागृहाकडे सादर झाल्याचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं. न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरच्या आरोपांचं गंभीर स्वरुप लक्षात घेऊन त्या प्रकरणी चौकशीसाठी तीन सदस्यांच्या समितीची घोषणा सभापतींनी केली.

'एक देश- एक निवडणूक' विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल सादर करण्यासाठी लोकसभेनं मुदतवाढ दिली आहे. हा अहवाल आता संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात सादर करता येईल.

**<u>केंद्रीय मंत्रिमंडळ</u>**

देशात चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्प उभारण्याला केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. ओडीशा, पंजाब आणि आंध्र प्रदेशमध्ये उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पांचा अंदाजित खर्च 4 हजार 594 कोटी रुपये असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वार्ताहरांना सांगितलं.

**<u>राज्य मंत्रिमंडळ</u>**

राज्याच्या पोलीस दलात 15 हजार शिपाई भरती करायला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यातल्या रास्त भाव दुकानदारांच्या नफ्यात वाढ करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला.

त्यानुसार आता या दुकानदारांना प्रतिक्विंटल दीडशे ऐवजी 170 रुपयांचा लाभ मिळेल. सोलापूर-पुणे-मुंबई हवाई मार्गातली व्यापारी तूट भरून काढण्यासाठी निधी देण्याचा निर्णयही काल झाला. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाअंतर्गत विविध महामंडळ कार्यरत आहेत; त्या महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या कर्ज योजनेतल्या जामीनदारीच्या अटी शिथिल करायला तसंच शासन हमीला पाच वर्षांची मुदतवाढ द्यायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे.

**मुख्यमंत्री-करार-नवीमुंबई**

देशातली साठ टक्के डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत, याचा आनंद आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नवी मुंबईत ऐरोली इथं कॅपिटालॅंड कंपनीच्या डेटा सेंटरचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं; त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. ते म्हणाले......

**आज अतिशय स्टेट ओएफ आर्ट अशा प्रकारच्या या Data Center च Capital Land च्या Data Center च या ठिकाणी उद्घाटन झालेलं आहे. हे जे Data Center आहे हे Technology wise सगळ्यात Advanced अशा प्रकारचं, डाटा सेंटर आहे ज्याच्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारे ज्या व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत त्या अतिशय चांगल्या पद्धतीच्या आहेत. आज आपल्याला माहिती आहे की आपण ज्या डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये आहोत त्याच्यामध्ये प्रत्येक गोष्टीचा एफिशियन्सी वाढवण्याकरता आपल्याला दाता सेंटर ची आवश्यकता पडते आणि म्हणून देशामध्ये ही कॅपेबिलिटी उभी होणं हे महत्त्वाचं आहे. आणि आज मला हे सांगताना आनंद वाटतो की देशाची साठ टक्के दाता सेंटर कॅपॅसिटी ही एकट्या महाराष्ट्रात उभी राहिलेली आहे.**

या कार्यक्रमात महाराष्ट्र शासन आणि कॅपिटालॅंड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत सुमारे 19 हजार 200 कोटी रुपयांची प्रस्तावित गुंतवणूक राज्यात होणार आहे, तसंच रोजगाराच्या अंदाजे 60 हजार संधी देखील उपलब्ध होणार आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या करारांतर्गत मुंबई आणि पुण्यात बिझनेस पार्क्स, डाटा सेंटर्स असे विविध प्रकल्प उभारण्यात येणार आहेत.

**मुख्यमंत्री-नवीमुंबई**

जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी आणि इंडियन पोर्ट्स असोसिएशन यांच्या वतीने उरण इथल्या जेएनपीए इथं काल ग्रीन अँड डिजिटल मेरिटाईम कॉरिडॉर्स लिडर्स डायलॉग आयोजित करण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि सिंगापूरचे उपपंतप्रधान गान किम येंग, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. भारत आणि सिंगापूर यांच्यातील सागरी व्यापार, पायाभूत सुविधा, आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील वाढतं सहकार्य आणि सामंजस्य करारांमुळे आर्थिक बंध अधिक दृढ होत आहेत, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. वाढवण बंदर विकासासाठी सिंगापूरनं सहकार्य करावं अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. केंद्रीय बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनवाल यांचा व्हिडीओ संदेश यावेळी दाखवण्यात आला.

**क्रीडा महाकुंभ**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त राज्य सरकारनं ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभाचं आयोजन केलं आहे. मुंबईत कुर्ला इथं आजपासून या महाकुंभाचा प्रारंभ होणार आहे. येत्या 22 ऑगस्टपर्यंत मुंबईकरांना पारंपरिक खेळांचा थरार पाहायला मिळणार आहे. कुर्ला इथलं जामसाहेब मुकादम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचं मैदान केवळ देशी आणि पारंपरिक खेळांसाठी राखीव करण्यात आलं आहे. या मैदानाचं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर देशी खेळांचं मैदान असं नामकरण आणि लोकार्पणही याच सोहळ्यात होणार आहे. आपली संस्कृती आणि परंपरा जागृत ठेवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवत असल्याचं कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी म्हटलं आहे.

**स्वातंत्र्यदिन लष्कर**

देशाच्या 79 व्या स्वातंत्र्यदिनाचं औचित्य साधून, तीनही सशस्त्र दलांनी तसंच तटरक्षक दलानं देशभरातील विविध शहरांमध्ये विशेष बँड सादरीकरणाचं आयोजन केलं आहे. पुण्यातील शनिवारवाडा आणि गांधी राष्ट्रीय संग्रहालयाच्या परिसरातही बँड सादर केला जाणार आहे. युवा पिढीला आपल्या देशाच्या अभिमानास्पद वारशाची ओळख करून देणं तसंच स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करण, देशभक्ती वाढवणं आणि ऑपरेशन सिंदूरच्या यशाचा उत्सव साजरा करण्याच्या उद्देशानं या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनस, गेटवे ऑफ इंडिया, फ्लोरा फाउंटन, नागपूरमध्ये दीक्षाभूमी, या ठिकाणी देखील हा उपक्रम होणार आहे.

**हर घर तिरंगा**

दरम्यान हर घर तिरंगा अभियानानिमित्त राज्यात सर्वत्र विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. पनवेल महानगर पालिकेनं हर घर तिरंगा मोहिमेंतर्गत महापालिकेच्या कार्यक्षेत्रातल्या विविध शाळा महाविद्यालयांमध्ये पत्रलेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, घेतली.

रत्नागिरी शहरात अग्रणी बँक जिल्हा व्यवस्थापक कार्यालय आणि नगर राजभाषा कार्यान्वयन समिती यांनी काल दुचाकी फेरी काढली. बँकेचे अधिकारी कर्मचारी आणि भारतीय तटरक्षक दलाचे जवान यात सहभागी झाले होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी इथं काल तिरंगा फेरीचं आयोजन करण्यात आल होतं. यामध्ये सर्वपक्षीय पदाधिकारी, विद्यार्थी, रिक्षा संघटना, सामाजिक संघटना सहभागी झाल्या होत्या.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत डीआरएम कार्यालय ते सोलापूर रेल्वे स्टेशनपर्यंत तिरंगा यात्रा आयोजित केली होती.

**निधन-अहिल्यानगर**

तृतीयपंथीयांच्या अहिल्या नगर जिल्हा अध्यक्ष काजल गुरू यांचं काल अल्प आजाराने निधन झालं. त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. तृतीयपंथीयांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

**पाऊस-सांगली**

सांगली जिल्ह्याच्या काही भागात काल जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे जनजीवन काही प्रमाणात विस्कळीत झालं असलं तरी जत आणि कवठेमहांकाळ तालुक्यातील खरीप पिकांसाठी हा पाऊस उपयुक्त ठरत आहे.

**हवामान**

आज मध्य महाराष्ट्र,कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. याबरोबरच किनारपट्टीलगतच्या भागात सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.